# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government ofMaharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4Dated27th Sept. 2011 &
Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## National Service Scheme

**Dr. Naresh M. Madavi**
Director(I/c.)
Ph. No. - 07132-223320

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: www.unigug.org
Email : nssdsw.gug@ gmail.com


पत्र क्र. No.GU/NSS/ 772 /2019

Dt : 06/07 /2019

प्रति,

मा. प्राचार्य/रासेयो कार्यक्रम अधिकारी,
संलग्नीत रासेयो महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषयः—** दिनांक ०१ जुलै ते ३० सप्टेंबर २०१९ या कालावधीत प्रस्तावीत ३३ कोटी वृक्षा रोपन कार्यक्रमामधील सहभागाबाबत.

**संदर्भः—** मा.मंत्री वित्त व नियोजन,वने महाराष्ट्र मंत्रालय मुंबई यांचे पत्र दिनांक २१/०६/२०१९

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये सलग्न पत्रात दिल्याप्रमाणे ०१ ते १५ बाबीवर अमलबजावणी करण्याबाबत मार्गदर्शक सुचना दिल्या आहेत. त्या प्रमाणे दिनांक ०१ जुलै ते ३० सप्टेंबर २०१९ या कालावधीत प्रस्तावीत ३३ कोटी वृक्षारोपन कार्यक्रमाबाबत कार्यवाही घेवून रासेयो विभागास अहवाल सादर करावा, ही विनंती.

धन्यवाद!

डॉ. नरेश मडावी
संचालक (प्र.)
राष्ट्रीय सेवा योजना
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**माहितीस्तव**
मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

मंत्री
महाराष्ट्र राज्य

मंत्री
वित्त आणि नियोजन, वने
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in

दिनांक : 29/6/019

विषय :- दि. १ जुलै ते ३० सप्टेंबर २०१९ या कालावधीतील प्रस्तावित ३३ कोटी वृक्षारोपण कार्यक्रमामधील सहभागाबाबत.

महोदय,

सन २०१७ ते सन २०१९ या ३ वर्षांच्या कालावधीमध्ये ५० कोटी वृक्षारोपणाचा कार्यक्रम राज्यात राबविण्यात येत आहे. सन २०१६ मधील २ कोटी, सन २०१७ मधील ४ कोटी आणि २०१८ मधील १३ कोटी वृक्षारोपण व संगोपन कार्यक्रमात आपण सक्रिय पुढाकार घेऊन जनतेच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वी केले, त्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे. सन २०१९ मध्ये ३३ कोटी वृक्षारोपणाचे उद्दिष्ट आहे. यामध्ये वन विभागासह शासनाचे इतर सर्व प्रशासकीय विभागांचा सहभाग आहे. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दि. ०६/०९/२०१८ अन्वये प्रत्येक प्रशासकीय विभागास आणि ग्रामपंचायतींना मा. मुख्यमंत्री ह्यांचे मान्यतेने ३३ कोटी वृक्षारोपण कार्यक्रमातंर्गत उद्दिष्ट निश्चित करुन देण्यात आले आहे.

२. सन २०१९ मधील ३३ कोटी वृक्षारोपण कार्यक्रमाच्या नियोजन व पुर्वतयारीमध्ये आपण गेल्या वर्षभरापासून पुढाकार घेऊन नेतृत्व दिले आहे. त्या अनुषंगाने आपल्या विभागाचे आणि आपण पालक मंत्री असलेल्या जिल्ह्याचे नियोजन जवळपास पूर्ण झाले असून दि. १ जुलै ते ३० सप्टेंबर २०१९ या कालावधीमध्ये प्रत्यक्ष वृक्षारोपणाची अंमलबजावणी व्हावयाची आहे. यासंदर्भात मी आपणास पुढील बाबींवर कार्यवाही होण्याबाबत विनंती करीत आहे.

१. मा. पालक मंत्री यांनी आपआपल्या जिल्ह्यातील वृक्ष लागवड कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबत संबंधित जिल्हाधिकारी यांना ३ महिन्यांचा कृती कार्यक्रम तयार करण्यास सांगावे. त्यानुसार दर आठवड्याला कोणत्या बाबी हाती घ्यावयाच्या व पूर्ण करावयाच्या याचे वेळापत्रक ठरवून त्यानुसार कार्यवाहीबाबत सर्व विभागांना मार्गदर्शन देऊन नेतृत्व करावे.

२. दि. १ जुलै २०१९ रोजी ३३ कोटी वृक्षारोपण कार्यक्रमाच्या महामोहिमेचा शुभारंभ मा. राज्यपाल, मा. मुख्यमंत्री व विविध क्षेत्रातील मान्यवर यांच्या उपस्थितीत आनंदवन, ता. वरोरा, जि. चंद्रपूर येथे होणार आहे. आपण देखील आपल्या जिल्ह्यातील सोयीच्या ठिकाणी वृक्षारोपणाचा भव्य शुभारंभ आपल्या शुभहस्ते करावा. वृक्षारोपणाचे फोटो वन विभागाच्या वेबसाईटवर अपलोड करावेत. जेणेकरून इतर लोक देखील १ जुलै ते ३० सप्टेंबर २०१९ या कालावधीमध्ये वृक्षारोपण करण्यासाठी प्रेरित आणि उद्युक्त होतील.

३. दि. १ जुलै ते ३० सप्टेंबर २०१९ या कालावधीत जिल्हयातील विविध यंत्रणांना दिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी क्षेत्रीय यंत्रणेबरोबर संपर्क व संवाद ठेवून त्यांना प्रोत्साहित करणे.

४. तसेच या कालावधीत दर दिवशी जसजशी वृक्ष लागवड होईल त्यानुसार वृक्षारोपण स्थळांची जिओ टॅगिंगसह माहिती वन विभागाच्या संकेतस्थळावर उत्तम छायाचित्रे व व्हिडियो क्लिप्स यांसह तात्काळ अपलोड करण्याबाबत सर्व यंत्रणांकडून कार्यवाही होण्याबाबत खात्री करणे.

५. शक्यतो उद्दिष्टानुसार किमान ७५ टक्के वृक्षारोपण दि. १५ ऑगस्ट २०१९ पर्यंत होईल अशारितीने नियोजन करावे. त्यामुळे पुढील घाईगडबड टाळता येईल. तसेच लावलेल्या झाडांना अधिक पावसाचे पाणी मिळाल्यास वृक्ष जिवंत राहण्याचे प्रमाण उत्तम राखता येईल.

वृक्ष लागवड व संगोपनासाठी मा. मंत्रीमंडळाच्या निर्णयानुसार आणि शा.नि., महसूल व वन विभाग दि. २५ जुलै,२०१८ अन्वये ज्या विभागांनी सन २०१९-२० मध्ये अद्यापही ०.५ टक्के मर्यादेत निधीची तरतूद केलेली नाही, त्यांनी त्वरीत तरतूद करावी. ज्या विभागांनी कमी तरतूद केली आहे, ती आवश्यकतेनुसार वाढवावी. ज्या विभागांनी तरतूद केली आहे, पण वितरित केली नाही तो निधी त्वरीत वितरित करणे.

७. वेगवेगळ्या सामाजिक आणि अध्यात्मिक संस्था, अशासकीय संस्था, एनजीओ, खाजगी संस्था, सीएसआर यांच्या बैठका घेऊन त्यांना वृक्षारोपणामध्ये सहभागी होण्यासाठी आवाहन करणे.

८. वृक्ष लागवडीच्या अंमलबजावणी कालावधीमध्ये जिल्हाधिकारी आणि इतर आधिकारी यांच्यासमवेत दर १५ दिवसांनी आपल्या जिल्ह्यात पत्रकार परिषद घेऊन वृक्ष लागवड, रोपांची उपलब्धता, मनुष्यबळ इत्यादींबाबत जनतेला माहिती देऊन सहभागाविषयी त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे.

९. महाराष्ट्र हरित सेनेचे सदस्य होण्यासाठी जिल्ह्यांमधील वेगवेगळे कार्यक्रम व सभासमारंभा मधून आवाहन करणे.

१०. वन विभागातील कॉल सेंटरवर जास्तीत जास्त लोकांनी संपर्क साधून वृक्ष लागवड व संगोपन आणि वन विभागाशी सबंधित घटक या संदर्भातील माहिती जनतेने घेण्याबाबत व त्यातून वन विभागाबरोबर जनतेचा संवाद वाढविण्याबाबत त्यांना सजग करणे.

११. ग्रामपंचायतींना दिलेल्या उद्दिष्टानुसार त्यांच्या क्षेत्रामध्ये मोठया प्रमाणात वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घेण्याबाबत ग्रामस्थांना विविध माध्यमातून प्रेरित करावे.

१२. वृक्षारोपणानंतर वृक्ष जिवंत राहण्याचे प्रमाण किमान ८०-९० टक्के राहण्यासाठी वेगवेगळ्या बैठका व कार्यक्रम यांच्या माध्यमातून सातत्याने आढावा घेणे. तसेच ही माहिती शासन निर्णय, महसूल व वन विभाग दि.१० ऑक्टोबर, २०१६ मधील **विवरणपत्र -२** प्रमाणे संबंधित प्रशासकीय विभागांनी वन विभागाच्या संकेतस्थळावर उत्तम छायाचित्रे, व्हिडोओ स्वरूपात आपलोड करण्याबाबत क्षेत्रिय यंत्रणांना निर्देश देणे.

१३. वृक्ष लागवड आणि संगोपनाचा कार्यक्रम जन आंदोलनात परावर्तित होण्यासाठी आणि लोकांनी वन आणि वृक्षाच्छादन वाढविण्यासाठी सत्याग्रहाच्या रूपाने "वन सत्याग्रह" ही संकल्पना लोकांमध्ये रूजविणे, वाढविणे यासाठी त्यांना प्रोत्साहित व उद्युक्त करणे.

१४. मा. पालक मंत्री यांनी क्षेत्रीय दौऱ्याच्या वेळी जिल्हयातील वृक्षारोपण स्थळांना आवर्जून भेट दयावी व वृक्ष जिवंत राहण्याचे प्रमाण उत्तम राखले जावे यासाठी विविध उपाययोजना करण्यासंदर्भात क्षेत्रिय यंत्रणांना मार्गदर्शन करावे.

१५. ज्या ठिकाणी झाडे जिवंत राहण्याचे प्रमाण कमी आहे ते प्रमाण ८०% ते ९०% राहण्यासाठी संबंधिताना विविध उपाययोजनांबाबत मार्गदर्शन व निर्देश दयावेत.

३. आपल्या जिल्ह्यास ३३ कोटी वृक्षारोपण कार्यक्रमातंर्गत दिलेल्या उद्दिष्टाप्रमाणे वृक्षारोपण, संरक्षण, संगोपन व संवर्धन इत्यादी बाबी यशस्वी करण्यासाठी उत्तम सहकार्याची व सहभागाची अपेक्षा करतो. वृक्षारोपणाच्या राष्ट्रीय कामात आपण पुढाकार घेऊन सर्व यंत्रणांना सक्रिय केल्यास, मी आपला अत्यंत आभारी राहीन.

स्नेहपूर्वक !

आपला,

(सुधीर मुनगंटीवार)

प्रति,
सर्व मा. पालकमंत्री आणि इतर मंत्री महोदय.